सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/९२२ **अत्यंत महत्त्वाचे** दिनांक : २६/०५/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' लागू करणेबाबतबाबत....**

**संदर्भ :** १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२६/ई ६६९४६४/वि शि ५, दि. २५ फेब्रुवारी, २०२६

२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांचे DHEPN-MV11012/269/2024-COLLWG1/ई.कॉम.नं. ८७९८४८, **दि. २२ एप्रिल, २०२६ चे पत्र.**

३. मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांचे ससं/उशि/पुवि/संकीर्ण/स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना २०२६/E-7282017, दिनांक २८ एप्रिल, २०२६ चे पत्र.

महोदय/महोदया,

शासन निर्णयानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा (Personal Accident Insurance) तसेच ऐच्छिक स्वरूपातील विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) योजना लागू करण्यात आली आहे. उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' बाबत आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील सर्व विद्यार्थ्यांना अवगत करण्याबाबत शासनाने निर्देशित केले आहे.

सदर 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' अंमलबजावणीबाबत शासनाकडून कळविण्यात आले आहे. या संबंधीचे पत्र व शासन निर्णय आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. त्यानुसार विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभाग यांना कळविण्यात येते की, स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजने ची माहिती आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागाच्या प्रवेश माहिती पुस्तिकेत, माहितीपत्रक, प्रवेशासंबंधीच्या तत्सम प्रकाशनांद्वारे व आपल्या संकेतस्थळावर प्रवेशासंदर्भातील माहिती समवेत, याचबरोबर प्रवेशाच्या ठिकाणी याचबरोबर प्रत्यक्ष प्रवेशावेळी आणि मुख्य सूचना फलकावर तसेच विद्यार्थी एकत्र येत असतात(उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करुन सर्व विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करावे.

सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. सदर संकेतथळावर योजनेबाबत मार्गदर्शन व शंका निरसनासाठी हेल्पलाईन नंबर व ई–मेल आयडी उपलब्ध करून दिलेला आहे.

सदर स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेबाबत आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागातील सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

या संबंधीचे पत्र व शासन निर्णय आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. शासन निर्देशानुसार सदर स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेसंदर्भात जबाबदारीने व काटेकोरपणे आपल्या स्तरावर वरीलप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितास सूचित करावे. कळावे, ही विनंती

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

# महाराष्ट्र शासन

शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, 17 डॉ. आंबेडकर रोड, पुणे-1

फोन नं. ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ E_mail ID- jdhepune@gmail.com

क्रमांक-संस/उशि/पुवि/संकीर्ण/स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना २०२६/E-7282017 दि. २८.०४.२०२६

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, सर्व खाजगी विद्यापीठ, पुणे विभाग,
३. प्राचार्य/प्राचार्या, सर्व अशासकीय अनुदानित, कायम विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये,
**<u>पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हे.</u>**

**विषय — राज्य सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित** "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" लागू करण्याबाबत..

संदर्भ - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे यांचे पत्र क्र. DHEPN-MV१०१२/२६९/२०२४-COLLWG१/ई.कॉप्युटर नं. ८७९८४८.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित पत्रानुसार कळविण्यात येते की, शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्रितील सार्वनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" अंतर्गत असलेला विद्यार्थी वैयक्तीक अपघातविमा (Personal Accident Insurance) याद्वारे "अनिवार्य" करण्यात आली आहे. मात्र ज्या विद्यापीठाकडील विमा योजनेद्वारे कमी रक्कमेच्या हप्त्यातून यापेक्षा जास्त रक्कमेचे संरक्षण मिळत असेल तर त्याबाबत नोडल अधिकारी म्हणून संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या सहमतीने त्या विद्यापीठास त्यांची योजना चालू ठेवता येईल. तथापि "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" अंतर्गत असलेला विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) "पूर्णपणे ऐच्छिक" असेल. त्यानुषंगाने विद्यापीठांने आवश्यक कार्यवाही करावी.

१. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर सदरहू योजनेचा तपशील संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावा.

२. योजनेची माहिती देण्यासाठी विद्यापीठ स्तरावर शिबीराचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती विस्तृत स्वरुपात देण्यात यावी.

३. सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. सदर संकेतस्थळावर योजनेबाबत मार्गदर्शनासाठी व शंका निरसनासाठी हेल्पलाईन नंबर व ई-मेल आयडी उपलब्ध करुन दिलेला आहे. सदर क्रमांकावर संबंधित प्रतिनिधींशी संपर्क करावा. प्रस्तुत योजना महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना अवगत करुन देउन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 04-05-2026
14:16:33

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

सोबत - वरीलप्रमाणे परिपत्रक.

प्रत - मा. . शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९९ .

DHEPN-MVI१०१२/२६९/२०२४-COLLWG१/ ई. कॉम्प. नं. ८७९८४८

### परिपत्रक

**विषय: राज्य सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" लागू करण्याबाबत**.

**वाचा:**
१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४/विशि ५ दिनांक १६.१०.२०२३
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४ / विशि ५ दिनांक २८.११. २०२३
३. शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२६/ई ६६९४६४/विशि ५ दि. २५.०२.२०२६

उपरोक्त विषयाबाबत, शासन निर्णय दि. २५.०२.२०२६ नुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" अंतर्गत असलेला विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा (Personal Accident Insurance) याद्वारे "**अनिवार्य** " करण्यात आली आहे. मात्र ज्या विद्यापीठाकडील विमा योजनेद्वारे कमी रकमेच्या हप्त्यातून यापेक्षा जास्त रकमेचे संरक्षण मिळत असेल तर त्याबाबत नोडल अधिकारी म्हणून संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या सहमतीने त्या विद्यापीठास त्यांची योजना चालू ठेवता येईल. तथापी "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" अंतर्गत असलेला विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) पुर्वीप्रमाणेच "पूर्णपणे ऐच्छिक" असेल. त्यानुषंगाने सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठांनी आवश्यक कार्यवाही करावी.

१. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर सदरहु योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावा.

२. योजनेची माहिती देण्यासाठी विद्यापीठ स्तरावर शिबीराचे आयोजन करून विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती विस्तृत स्वरूपात देण्यात यावी.

३. सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. सदर संकेतस्थळावर योजनेबाबत मार्गदर्शनासाठी व शंका निरसनासाठी हेल्पलाईन नंबर व ई-मेल आयडी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर क्रमांकावर संबंधित प्रतिनिधींशी संपर्क करावा. प्रस्तुत योजना महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

Digitally signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 22-04-2026 13:18:49

सोबत- वरीलप्रमाणे.

( **डॉ. शैलेंद्र देवळाणकर** )
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रति,

कुलसचिव,
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे

प्रत-

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

**राज्य सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित “स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना” करिता इंन्शुरन्स ब्रोकर्स नोडल एजन्सीची निवड करणे**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२६/ई ६६९४६४ / वि शि ५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक - २५/०२/२०२६

**संदर्भ : -** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४ / वि शि ५ दिनांक १६ ऑक्टोंबर २०२३

२ ) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४ / वि शि ५ दिनांक २८ नोव्हेंबर , २०२३

**प्रस्तावना :**

संदर्भ क्र. १ अन्वये दि. १६ ऑक्टोंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयांद्वारे राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक स्वरुपाची विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा (Personal Accident Insurance ) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance ) योजना लागू करण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये दि. २८ नोव्हेंबर , २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी लागू केलेल्या विमा योजनेचे “स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना” असे नामकरण करण्यात आले आहे.

प्रस्तुत “स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेच्या स्वरुपात बदल करण्याचे तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून पुढील ३ वर्षाकरीता इंन्शुरन्स ब्रोकर्स नोडल एजन्सीची निवड करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** -

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित “स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना” अंतर्गत असलेला विद्यार्थी **वैयक्तीक अपघात विमा** (Personal Accident Insurance ) **याद्वारे “अनिवार्य” करण्यात येत आहे.** मात्र ज्या विद्यापीठाकडील विमा योजनेद्वारे कमी रकमेच्या हप्त्यातून यापेक्षा जास्त रकमेचे संरक्षण मिळत असेल तर त्याबाबत नोडल अधिकारी म्हणून संचालक, उच्च शिक्षण

संचालनालय, पुणे यांच्या सहमतीने त्या विद्यापीठास त्यांची योजना चालू ठेवता येईल. तथापी "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" अंतर्गत असलेला विद्यार्थी **वैद्यकीय विमा** (Medical Insurance ) **पुर्वीप्रमाणेच "पूर्णपणे ऐच्छिक" असेल.**

२. वरील सुधारणेसहित **"शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून पुढील ३ वर्षाकरीता इन्शुरन्स ब्रोकर्स नोडल एजन्सीची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रीया सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.** त्यानुसार पुढील कार्यवाही संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी करावी व याबाबतचा उचित प्रस्ताव शासनाच्या मान्यतेकरिता सादर करावा.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०२२५११५२१३१३०८ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.02.25 11:53:36 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई .
३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय , मुंबई .
४) मा. उपमुख्यमंत्री (राउशु , क्रिडा) यांचे सचिव, मंत्रालय , मुंबई .
५) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
६) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
७) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- महाराष्ट्र १ व २, मुंबई/नागपूर.
९) महालेखापाल (लेखा परीक्षा)- महाराष्ट्र १ व २, मुंबई/ नागपूर.
१०) सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय, मुंबई.
११) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३) संचालक, कला संचालनालय, मुंबई.
१४) कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
१५) सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१६) विमा संचालक, विमा संचालनालय, गृहनिर्माण भवन (म्हाडा), वान्द्रे (पूर्व), मुंबई.
१७) जिल्हा कोषाधिकारी, पुणे.
१८) निवड नस्ती (विशि-५).